**CNR NO. MHST05-000621-2017**

**विशेष दिवाणी मुकदमा क्र. ९४/२०१७**

बॅक ऑफ इंडीया ..... **वादी**

**वि.**

राजाराम श्रीपती मोहिते वगैरे .... **प्रतिवादी**

## नि. २४ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.२अ व २ब यांनी त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत दावा चालविणेचा झालेला आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादी यांनी नि.२६ वर म्हणणे दाखल करुन अर्जास तीव्र विरोध केला आहे .

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांचे निवेदन असे की, प्रतिवादी क्र.२ हा सहकारी साखर कारखाना असून त्याचे संचालक मंडळ व इतर अधिकारी गळीत हंगामात व्यस्त असल्यामुळे तसेच प्रलंबित फौजदारी खटल्यातील सर्व आवश्यक माहिती व कागदपत्रे मुदतीत उपलब्ध न झाल्यामुळे कैफियत देण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे प्रतिवादीविरुध्द कैफियत नाहीचा आदेश झाला आहे. सदरचा आदेश रद्द न झालेस प्रतिवादीचे कशातही न भरुन येण्यासारखे कायमस्वरुपी नुकसान होणार आहे. तरी कैफियत नाहीचा आदेश रद्द करावा. वादीच्या वकीलांचे निवेदन असे की, प्रतिवादी यांना दि.२०/०१/२०१८ रोजी समन्साची बजावणी झालेली आहे. तरी केवळ काम लांबविण्यासाठी सुमारे ६ महिन्यांच्या विलंबाने कैफियत दाखल केली आहे. अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा असून तो नामंजूर करणेत यावा. यदाकदाचित मंजूर केल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करणेत यावी.

४. प्रतिवादीचा अर्ज व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द रक्कम वसुलीसाठी केलेला असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. अभिलेख पडताळला असता नि.१ वर या प्रतिवादींविरूध्द विना कैफियत आदेश पारीत करणेत आलेले नाहीत. परंतु ती केवळ तांत्रीक बाब असून प्रतिवादीने वेळेत कैफियत दाखल केली नसल्यामुळे तो आदेश पारीत झाला आहे असेच गृहित धरावे लागेल. सदर प्रतिवादींना कैफियत देणेची संधी दिल्यास दाव्याचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतू प्रतिवादींनी केलेल्या विलंबाकरीता त्यांच्यावर खर्च बसविणे योग्य होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.२अ व २ब यांना कैफियत देण्यास झालेला विलंब रक्कम रु.५००/- खर्च वादीस देण्याच्या अटीवर माफ केला आहे.

Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.09.27 17:07:39 +0530

करा‍ड. **(प्र. अ. सवदीकर)**
दि. २७/०९/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड